# कल्याण डोंबिवली महानगरपालिका

सामान्य प्रशासन मुख्यालय

शंकरराव चौक, कल्याण (पश्चिम) ०२५१–२२०३६२१

## – जाहिरात –

शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ अंतर्गत, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत एक वर्षाच्या कालावधीकरीता नियुक्ती करणेकामी खालीलप्रमाणे पात्रता धारण करणाऱ्या शिकाऊ उमेदवारांकडून दि.१५/ ५ /२०२३ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | निर्देशित पद | प्रशिक्षणाचा कालावधी | दरमहा पाठयवेतन रुपये | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|
| A | B | C | D | E |
| १ | डिग्री सिव्हील इंजिनिअर | १ वर्षे | रु.९०००/– | मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य (Civil) अभियांत्रिकी शाखेची पदवी (Degree). |
| २ | डिप्लोमा सिव्हील इंजिनिअर | १ वर्षे | रु.८०००/– | मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य (Civil) अभियांत्रिकी शाखेची पदवीका (Diploma). |
| ३ | डिग्री मॅकेनिकल इंजिनिअर | १ वर्षे | रु.९०००/– | मान्यताप्राप्त विद्यापीठाची यांत्रिकी (Machanical) अभियांत्रिकी शाखेची पदवी (Degree). |
| ४ | डिप्लोमा मॅकेनिकल इंजिनिअर | १ वर्षे | रु.८०००/– | मान्यताप्राप्त विद्यापीठाची यांत्रिकी (Machanical) अभियांत्रिकी शाखेची पदवीका (Diploma). |
| ५ | डिग्री इलेक्ट्रीकल इंजिनिअर | १ वर्षे | रु.९०००/– | मान्यताप्राप्त विद्यापीठाची विद्युत (Electrical) अभियांत्रिकी शाखेची पदवी (Degree). |
| ६ | डिप्लोमा इलेक्ट्रीकल इंजिनिअर | १ वर्षे | रु.८०००/– | मान्यताप्राप्त विद्यापीठाची विद्युत (Electrical) अभियांत्रिकी शाखेची पदवीका (Diploma). |

**(अ) अर्ज स्वीकारण्याचे ठिकाण** :– उप आयुक्त (सा.प्र.), कल्याण डोंबिवली महानगरपालिका, प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, शंकरराव चौक, कल्याण (प.)पिन–४२१ ३०१

**(ब) अर्ज स्वीकारण्याचा कालावधी** :– जाहिरात प्रसिध्दी दिनांक ते दि.१५/ ५ /२०२३ पर्यंत कार्यालयीन वेळेत.

सदर जाहिरात www.kdmc.gov.in या कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर आणि नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

**अटी व शर्ती.**

(१) शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ नुसार शिकाऊ उमेदवाराची निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पाठयवेतनावर (Stipend) एक वर्षाच्या कालावधीसाठी नेमणूक करावयाची आहे. शिकाऊ उमेदवाराना पाठयवेतना व्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रकारच्या सोयी सुविधा व भत्ते अदा केले जाणार नाहीत.

(२) शिकाऊ उमेदवारांचा प्रशिक्षण कालावधी हा आदेशाच्या दिनांकापासून असेल व ते प्रत्यक्ष हजर होतील, त्या तारखे पासून एक वर्षाकरीता राहिल. शिकाऊ उमेदवाराचा नियुक्ती कालावधी संपल्यानंतर संपुष्टात येईल, त्यापुढे त्यांना कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या सेवेत सामावून घेण्याबाबत किंवा भविष्यात कायम स्वरुपी नोकरी मागण्याचा अधिकार व हक्क राहणार नाही.

(३) शिकाऊ उमेदवारांनी आपले संपुर्ण नांव, पत्रव्यवहाराचा पुर्ण पत्ता, भ्रमणध्वनी/दुरुध्वनी क्रमांक, मेल आयडी, शैक्षणिक अर्हता, जन्म तारीख, जात प्रवर्ग, आधार कार्ड इत्यादी तपशिलासह विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.

( डॉ.भाऊसाहेब दांगडे ) भा.प्र.से.

आयुक्त

कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.